# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १०७-२२** **दिनांक :- १६/०४/२०२२**

## रिक्षा व मोबाईल चोरी करणा-या आरोपीतांना पेल्हार पोलीसांनी केले जेरबंद.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०७/०४/२०२२ रोजी २३.०० वा. चे दरम्यान अशोक चाळ, जाबरपाडा, पेल्हार गाव, नालासोपारा (पु.), ता. वसई, जि. पालघर येथे फिर्यादी नामे. श्री. रामचंद्र देवनाथ पाल, रा. अशोक चाळ, जाबरपाडा, पेल्हार गाव, नालासोपारा (पु.), ता. वसई यांनी त्यांची बजाज कंपनीची ऑटो रिक्षा क्रं.एम.एच.४७/सी.४९५५ हि उभी करुन ठेवलेली असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन चोरुन नेले बाबत तक्रारीवरुन अज्ञात आरोपीता विरुध्द पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. I ३२४/२०२२ भा.दं.वि.सं.कलम-३७९ प्रमाणे दिनांक ०९/०४/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

तसेच दिनांक २९/०३/२०२२ रोजी ०२.०० वा. चे दरम्यान स्नेह पेट्रोलपंपा समोर, सर्विस रोडवर, पेल्हार गाव, नालासोपारा (पु.), ता. वसई, जि .पालघर येथे फिर्यादी नामे. श्री. नंददिप लक्ष्मण म्हस्के, रा. योगीनगर, बोरीवली (प.), मुंबई हे त्यांचे मालकीची टॅक्सी क्रं.एम.एच.०४/जी.डी. ८८२५ हिचेमध्ये झोपलेले असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांचे गाडीचे मागील दरवाजाच्या काचेतुन डॅशबोर्डवर ठेवलेला मोबाईल फोन चोरी करुन चोरुन नेले बाबत तक्रारीवरुन अज्ञात आरोपीता विरुध्द पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. I २९१/२०२२ भा.दं.वि.सं. कलम-३८० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वर नमुद दाखल गुन्हयाचे अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळास भेट देवून गुप्त बातमीदाराचे मार्फतीने माहिती प्राप्त करुन आरोपी नामे. १) अमजद जमीर खान, रा. पेल्हार, नालासोपारा (पु.), ता. वसई, २) आमिन मेहमुद पठाण, रा. पेल्हार, नालासोपारा (पु.), ता. वसई, ३) नितिन सुग्रीव चव्हाण, रा. बिलालपाडा, नालासोपारा (पु.), ता. वसई, यांना वर नमुद गुन्हयांत अटक करुन त्यांचेकडून चोरीस गेलेले रिक्षा व मोबाईल फोन असा एकुण-१,१०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.